Google ला सर्च करा

गुरुमाऊली

# माझा अभ्यास

Study From Home

गुरुमाऊली

एक शैक्षणिक व्यासपीठ

Subscribe

## इयत्ता – सहावी ( 17 ऑगस्ट ) विषय – मराठी

Subscribe

खालील बटणांना क्लिक करून ऑनलाईन टेस्ट सोडवू शकता.

मराठी टेस्ट

गणित टेस्ट



इंग्रजी टेस्ट

हिंदी टेस्ट

इति.नाशा टेस्ट

सेमी गणित टेस्ट

भूगोल टेस्ट

विज्ञान टेस्ट

टेस्ट सोडवा

## वाचा व समजून घ्या.

### ६ पण थोडा उशीर झाला...

माझ्या बाबांनाही माझा खूप अभिमान वाटायचा. मी सुट्टीत आलो, की ते कडकडून मिठीत घ्यायचे. मी येताना आणलेली मिठाई साऱ्या गावात वाटायचे. माझी आई खूप हळवी. माझ्या पाठीवरचा बंदुकीच्या गोळीचा व्रण बघून, तिनं जे अंथरूण धरलं, ते सोडलंच नाही. मी सगळ्यांत धाकटा, म्हणून सगळ्यांचा जीव माझ्यासाठी तीळ तीळ तुटत असे. या हळव्या माउलीच्या व प्रेमळ बांधवांच्या आठवणी फेर धरायच्या; पण भारतमातेच्या संरक्षणाची जबाबदारीही मला तितकीच महत्त्वाची वाटायची. मला वाटायचं, 'भारतमातेसाठी लढताना बलिदान द्यावं लागलं, तर माझ्या अंगावर तिरंगा मानाने ठेवला जाईल. ते पाहताना माझ्या घरच्यांचा ऊर अभिमानाने फुलून येईल.' काल सकाळीच गावाकडून आलेल्या सुखदेवने गावाकडचा सांगावा सांगितला. माझ्या आईचं दुखणं वाढलं होतं. आईने त्याच्यासोबत निरोप पाठवला होता. तिचा प्रत्येक शब्द माझ्या अंतरंगाचा ठाव घेत होता. 'मी आजारी आहे; पण तू माझी काळजी करू नको. घरातले सगळे माझी नीट काळजी घेतात, मला जपतात. तू आपल्या भारतमातेला जप, तिचं रक्षण कर, तिची काळजी घे.' माझं मन ढसढसा रडत होतं. डोळ्यांतलं पाणी हटेना. जीव घाबराघुबरा होऊ लागला. मन सैरभैर झालं. तसा मी उठलो, थेट मेजरसाहेबांच्या पुढ्यात जाऊन उभा राहिलो. माझी अवस्था पाहून त्यांचंही मन हेलावलं. त्यांनी माझी रजा तात्काळ मंजूर केली.

कसाबसा सामानाचा पसारा आवरून गावच्या वाटेला लागलो. आठ-दहा दिवसांचा प्रवास, वेळ सरता सरत नव्हता, रस्ता कटता कटत नव्हता. कधी एकदाचा आईला पाहीन असं झालं होतं. आईचे ते खडबडीत हात आपल्या गालांवरून फिरावेत, 'आलं माझं लेकरू,' असं म्हणत आईनं कुशीत घ्यावं अन् मीही आसुसल्या मनाने तिच्याकडून लाड करून घ्यावेत असं विचारांचं काहूर डोक्यांत माजलं होतं.

गावाच्या वेशीवर आलो, तसं जो तो हातातलं काम सोडून कावराबावरा होऊन माझ्याकडं पाहू लागला. गावातल्या पाराजवळ पोहोचलो, तसं काहीतरी विपरीत घडलंय हे मी ताडलं. हातातल्या जाडजूड ट्रंका तिथंच टाकून घराच्या दिशेनं धावत सुटलो. गावच्या वेशीपासून माझ्यामागून येणारे गावकरीही धावू लागले. मी वाड्याच्या दरवाजातून आत पाऊल टाकताच बहिणी माझ्या गळ्यात पडून रडू लागल्या.



भाऊबंद पडवीत ठिक्याच्या तळवटावर खाली माना घालून बसले होते. माझी नजर मात्र घरभर फिरत होती. माझी आई कुठे दिसते का? माझी आई कुठून येते का? 'माझं लेकरू आलं', या तिच्या आवाजातल्या शब्दांचा कानोसा मी घेत होतो. तिच्या त्या थरथरत्या स्पर्शाला माझं मन आतुरलं होतं; पण यापुढं माझी आई मला कधीच दिसणार नव्हती. मी तिला भेटायला आलो होतो; पण थोडा उशीर झाला...

वाचा व सोडवा.

## 4 अपूर्णांकांवरील क्रिया

टेस्ट सोडवा


2. संख्यारेषेवर पुढील अपूर्णांक दाखवा.

(1) $\frac{3}{5}$, $\frac{6}{5}$, $2\frac{3}{5}$ (2) $\frac{3}{4}$, $\frac{5}{4}$, $2\frac{1}{4}$

**जाणून घेऊया.**

### अपूर्णांकांचा गुणाकार

$\frac{3}{5} \times \frac{1}{2}$ हा गुणाकार आयताकृती पट्टीच्या साहाय्याने कसा केला आहे ते पाहा.



- एक आयताकृती पट्टी घेऊन तिचे उभ्या रेषा काढून 5 समान भाग करा.
- $\frac{3}{5}$ हा अपूर्णांक दर्शवणारा भाग रेखांकित करा.
- $\frac{3}{5}$ चा $\frac{1}{2}$ एवढा भाग दाखवायचा आहे म्हणून त्याच पट्टीचे 2 समान भाग करण्यासाठी मधोमध आडवी रेघ काढा.
- त्या आडव्या 2 भागांपैकी 1 भाग वेगळ्या प्रकारे रेखांकित करा.

आपण पूर्ण पट्टीचे 2 समान भाग केले. त्या वेळी $\frac{3}{5}$ भागाचेही 2 समान भाग केले. त्यांतील 1 भाग घेण्यासाठी दोनदा रेखांकित केलेला भाग विचारात घ्या.

एकूण समान चौकटी 10 झाल्या. त्यांपैकी 3 चौकटी दोनदा रेखांकित केलेल्या आहेत. या चौकटी म्हणजे दोनदा रेखांकित केलेला भाग अपूर्णांक रूपात $\frac{3}{10}$ आहे. $\frac{3}{5} \times \frac{1}{2} = \frac{3}{10}$

आपण वरील गुणाकार पुढीलप्रमाणे करू शकतो. $\frac{3}{5} \times \frac{1}{2} = \frac{3 \times 1}{5 \times 2} = \frac{3}{10}$

**हे मला समजले.**

**दोन अपूर्णांकांचा गुणाकार करताना अंशांचा गुणाकार अंशस्थानी व छेदांचा गुणाकार छेदस्थानी लिहितात.**

**उदा.** सुलोचनाबाईंची 42 एकर शेती आहे. त्यांनी त्या शेताच्या $\frac{2}{7}$ भागात गहू लावला, तर त्यांनी किती एकर जागेत गहू लावला?

42 चा $\frac{2}{7}$ काढायचा आहे. $\therefore \frac{42}{1} \times \frac{2}{7} = \frac{42 \times 2}{1 \times 7} = \frac{6 \times 7 \times 2}{7} = 12$

सुलोचनाबाईंनी 12 एकर जागेत गहू लावला.

टेस्ट सोडवा

Read and solve.


2. Show the following fractions on the number line.

(1) $\frac{3}{5}$, $\frac{6}{5}$, $2\frac{3}{5}$ (2) $\frac{3}{4}$, $\frac{5}{4}$, $2\frac{1}{4}$

**Let's learn.**

## Multiplication of Fractions

See how the multiplication $\frac{3}{5} \times \frac{1}{2}$ is done with the help of the rectangular strip.



- Draw vertical lines to divide a rectangular strip into 5 equal parts.
- Shade the part that shows the fraction $\frac{3}{5}$.
- We have to show $\frac{1}{2}$ of $\frac{3}{5}$. So, draw a horizontal line to divide the strip into two equal parts.

- Shade one of the two horizontal parts in a different way.

When we divided the strip into 2 equal parts, we also divided the $\frac{3}{5}$ part into 2 equal parts. To take one of those parts, consider the parts shaded twice.

We have 10 equal boxes. Of these, 3 boxes have been shaded twice.

These boxes, i.e., the part shaded twice can be written as the fraction $\frac{3}{10}$.

$\frac{3}{5} \times \frac{1}{2} = \frac{3}{10}$.

We can carry out the above multiplication like this : $\frac{3}{5} \times \frac{1}{2} = \frac{3 \times 1}{5 \times 2} = \frac{3}{10}$

**Now I know –**

**When multiplying two fractions, the product of the numerators is written in the numerator and that of the denominators, in the denominator.**

**Example :** Sulochanabai owns 42 acres of farm land. If she planted wheat on $\frac{2}{7}$ of the land, on how many acres has she planted wheat?


We must find out $\frac{2}{7}$ of 42 acres $\therefore \frac{42}{1} \times \frac{2}{7} = \frac{42 \times 2}{1 \times 7} = \frac{6 \times 7 \times 2}{7} = 12$


Sulochanabai has planted wheat on 12 acres of land.

## Read and understand.


टेस्ट सोडवा


**4. Now, put the following pictures in a proper sequence.**











**5. Copy an appropriate line or lines from the story for each of the pictures above.**

---

**LEARNING about LANGUAGE**

### NOUNS

- Read the following words and then put them in the proper row in the table.

| | |
|---|---|
| camel | habit |
| jackal | happiness |
| water | Grandpa |
| village | friends |
| farm | farmer |
| field | helpers |
| time | Radhika |
| trick | stick |
| treat | sugarcane |

| | |
|---|---|
| **People :** | |
| **Animals :** | |
| **Places :** | |
| **Things we can feel, see, etc. :** | |
| **Things we cannot touch, see, etc. :** | |

- The words in the table above are together known as nouns in English. Add two more words to each row in the table.

पाठ वाचा व स्वाध्याय सोडवा. **४. वैदिक संस्कृती**

टेस्ट सोडवा

'भागदुघ' असे म्हणत. 'भाग' म्हणजे वाटा. 'जन'च्या उत्पन्नातील राजाचा 'भाग' गोळा करणारा, तो भागदुघ. राजाला मार्गदर्शन करण्यासाठी 'सभा', 'समिती', 'विदथ' आणि 'जन' अशा चार संस्था होत्या. त्यांमध्ये राज्यातील लोक सहभागी होत. 'सभा' आणि 'विदथ' या संस्थांच्या कामकाजात स्त्रियांचाही सहभाग असे. राज्यातील ज्येष्ठ व्यक्तींच्या मंडळास 'सभा' म्हणत तर लोकांच्या सर्वसाधारण बैठकीस 'समिती' असे म्हणत. समितीमध्ये लोकांचा सहभाग असे.

पुढे वैदिक विचारप्रवाहात 'स्मृति' व 'पुराण' नावाचे वाङ्मय निर्माण झाले. वेद, स्मृती, पुराणे, स्थानिक लोकधारणा इत्यादींवर आधारलेला धार्मिक प्रवाह कालांतराने 'हिंदू' या नावाने ओळखला जाऊ लागला.

प्राचीन भारतात यज्ञविधी आणि वर्णव्यवस्था यांच्याबाबतीत वैदिक प्रवाहापेक्षा वेगळी भूमिका घेणारे धार्मिक प्रवाह अस्तित्वात होते. पुढील पाठात आपण त्यांचा परिचय करून घेणार आहोत.

## स्वाध्याय

**१. पाठातील आशयाचा विचार करून उत्तरे लिहा.**

(१) वैदिक साहित्यातील विद्वान स्त्रिया

.................................

(२) वेदकालीन मनोरंजनाची साधने

.................................

(३) वेदकालीन चार आश्रम

.................................

**२. चूक की बरोबर ओळखा.**

(१) यज्ञात म्हटले जाणारे मंत्र–ऋग्वेद

(२) अथर्व ऋषींचे नाव दिलेला वेद–अथर्ववेद

(३) यज्ञविधींच्या वेळी मंत्रगायन करण्यास मार्गदर्शन करणारा वेद–सामवेद

**३. एका शब्दात उत्तरे लिहा.**

(१) वैदिक वाङ्मयाची भाषा......... .

(२) विद् म्हणजे......... .

(३) गोधूम म्हणजे......... .

(४) घराचा प्रमुख म्हणजे......... .

(५) श्रेणींच्या प्रमुखाला म्हणत......... .

**४. नावे लिहा.**

(१) तुम्हांस माहीत असलेली वाद्ये

........................... .

(२) सध्याच्या काळातील स्त्रियांचे किमान दोन दागिने ........................... .

(३) सध्याची मनोरंजनाची साधने

........................... .

**५. थोडक्यात उत्तरे लिहा.**

(१) वेदकालीन लोकांच्या आहारामध्ये कोणकोणत्या पदार्थांचा समावेश होता?

(२) वेदकाळात गाईची विशेष काळजी का घेतली जाई?

(३) संन्यासाश्रमात मनुष्याने कसे वागावे अशी अपेक्षा होती?

**६. टीपा लिहा.**

(१) वेदकालीन धर्मकल्पना

(२) वेदकालीन घरे

(३) वेदकालीन शासनव्यवस्था

**उपक्रम**

(१) आपल्या परिसरातील काही कारागिरांच्या मुलाखती घेऊन त्यांची माहिती लिहा.

(२) पाठात आलेले नवीन शब्द व त्यांचे अर्थ यांची यादी करा.

* * *

**निरीक्षण करा व समजून घ्या.**

## ४. हवा व हवामान

टेस्ट सोडवा

**सांगा पाहू.**

लहानपणापासून तुम्ही उन्हाळा, पावसाळा आणि हिवाळा हे ऋतू अनुभवले आहेत. त्या आधारे पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा.

- जानेवारी ते डिसेंबर या वर्षभराच्या काळात सर्वसाधारणतः कोणते ऋतू कोणत्या महिन्यांत येतात ते तक्ता स्वरूपात वहीत लिहा.
- पाऊस पडत असेल त्या वेळी आपण कोणते विशेष कपडे घालतो ?
- लोकरीचे कपडे आपण केव्हा वापरतो ?
- तलम सुती कपडे प्रामुख्याने कोणत्या ऋतूत वापरतात ?

**भौगोलिक स्पष्टीकरण**

### ※ हवामान

तुमच्या असे लक्षात येईल की प्रत्येक ऋतूचा विशिष्ट कालावधी असतो. सर्वसाधारणपणे वर्षाच्या त्याच कालखंडात आपण हे ऋतू अनुभवत असतो. हवामानशास्त्रज्ञ एखाद्या प्रदेशातील हवेचे अनेक वर्षे निरीक्षण करतात. या अभ्यासातून त्या प्रदेशातील हवेची सरासरी स्थिती निश्चित केली जाते. हवेची अशी दीर्घकालीन सरासरी स्थिती म्हणजे त्या प्रदेशाचे 'हवामान' होय. उदा., हवामान शीत व कोरडे, उष्ण व दमट किंवा उष्ण व कोरडे असे सांगता येते.

हवेमध्ये तापमान, वारे, आर्द्रता, इत्यादींमुळे वारंवार बदल घडताना आढळतात. ही सर्व हवेची मुख्य अंगे आहेत. त्यांचा आपल्या दैनंदिन व्यवहारावर व जीवनशैलीवर परिणाम होत असतो. हवेच्या या अंगांचा विचार हवामान सांगण्यासाठी केला जातो.

### ※ हवेची अंगे

- **तापमान** : पृथ्वीच्या पृष्ठभागास सूर्यापासून उष्णता मिळते. या उष्णतेमुळे पृथ्वीचा पृष्ठभाग तापतो. तापलेल्या भूपृष्ठाच्या सान्निध्यामुळे जवळची हवा तापते व त्यानंतर हवेचे वरचे थर क्रमाक्रमाने तापतात. त्यामुळे समुद्रसपाटीपासून जसजसे उंच जाऊ तसतसे हवेचे तापमान कमी होते. अशाच प्रकारे साधारणपणे विषुववृत्तापासून दोन्ही ध्रुवांकडे तापमान कमी कमी होत जाते.

- **हवेचा दाब** : हवेला वजन असते त्यामुळे दाब निर्माण होतो. याला हवेचा दाब म्हणतात. वातावरणाच्या सर्वांत खालच्या थरावर त्यावरील हवेचा दाब पडतो त्यामुळे हवेची घनता वाढते. पृथ्वीच्या पृष्ठभागालगत हवेचा दाब जास्त असतो. उंचीनुसार तो कमी होतो. हा झाला हवेचा ऊर्ध्व दाब. तापमानातील फरकामुळे देखील हवेच्या दाबात बदल होतो. हे बदल क्षितिज समांतर दिशेत घडतात. त्यामुळे हवेचे वाऱ्यात रूपांतर होते.

- **वारे** : जास्त हवेच्या दाबाकडून कमी हवेच्या दाबाकडे हवा क्षितिजसमांतर दिशेत वाहू लागते, त्यास वारा म्हणतात. कमी व जास्त हवेच्या दाबातील फरकानुसार वाऱ्याचा वेग ठरतो.

- **आर्द्रता** : वातावरणात बाष्प असते. ज्या हवेत बाष्प जास्त असते ती हवा दमट असते. वातावरणातील दमटपणास आर्द्रता म्हणतात. वातावरणातील आर्द्रतेचे प्रमाण तापमानावर अवलंबून असते. जास्त तापमानाच्या हवेमध्ये जास्त बाष्प मावू शकते.

- **वृष्टी** : हवेतील बाष्पाचे पाणी व हिम यांत होणारे रूपांतरण व ते पुन्हा पृथ्वीवर येणे यास वृष्टी म्हणतात. पाऊस, हिम, गारा इत्यादी वृष्टीची रूपे आहेत.

हवा कशी आहे हे त्या त्या वेळेनुसार सांगतात, तर हवामान दीर्घकालीन परिस्थितीनुसार सांगतात. हवेत सतत बदल होत असतो व तो सहजपणे जाणवतो. हवामानातील बदल दीर्घकाळाने होतात. ते सहज जाणवणारे नसतात.

अक्षवृत्तीय स्थान, समुद्रसपाटीपासून उंची, समुद्रसान्निध्य, सागरी प्रवाह हे घटक हवामानावर परिणाम करतात. याशिवाय पर्वतरांगा, जमिनीचा प्रकार, स्थानिक वारे, इत्यादी घटकांचा देखील त्या त्या प्रदेशातील हवामानावर परिणाम होतो.

**जरा डोके चालवा !**

१. थंड हवेच्या प्रदेशात तुम्ही कोणते व्यवसाय कराल ?

२. उष्ण हवेच्या प्रदेशात तुम्ही कोणते व्यवसाय कराल ?

सजीवांतील विविधता आणि वर्गीकरण

# वाचा व स्वाध्याय सोडवा.

टेस्ट सोडवा



**हे नेहमी लक्षात ठेवा.**

सजीव सृष्टीतील वनस्पती व प्राण्यांमध्ये खूप मोठी विविधता आढळून येते. प्रत्येक वनस्पती आणि प्राणी वैशिष्ट्यपूर्ण आहे. सजीव सृष्टीतील विविधता जपण्याचा आपण सर्वांनी प्रयत्न करणे गरजेचे आहे.



**आपण काय शिकलो?**

- वनस्पतींचे खोडांचे आकार व उंचीनुसार, जीवनक्रम कालावधीनुसार, अधिवासानुसार वर्गीकरण केले जाते.
- प्राण्यांचे पेशीरचनेनुसार, पाठीच्या कण्यानुसार, पुनरुत्पादन पद्धती व अधिवासानुसार वर्गीकरण केले जाते.

DVKTI9

## स्वाध्याय

१. **सांगा, मी कोणाशी जोडी लावू?**

| 'क' गट | 'ख' गट |
|---|---|
| अ. उभयचर | १. माकड |
| आ. पृष्ठवंशीय | २. साप |
| इ. खवले असणारे | ३. बेडूक |

२. **आमच्यात वेगळा कोण?**

अ. बुरशी, भूछत्र, शेवंती, स्पायरोगायरा
आ. आंबा, वड, ताड, हरभरा
इ. द्राक्षे, संत्रे, लिंबू, जास्वंद
ई. सूर्यफूल, वड, ज्वारी, बाजरी
उ. पेरू, मुळा, गाजर, बीट
ऊ. हरीण, मासा, मानव, कृमी.

३. **आमच्यात फरक काय आहे?**

अ. सपुष्प वनस्पती – अपुष्प वनस्पती
आ. वृक्ष – झुडूप
इ. पृष्ठवंशीय प्राणी – अपृष्ठवंशीय प्राणी

४. **सत्य की असत्य ओळखा.**

अ. गोगलगाय हा जलचर प्राणी आहे.
आ. उभयचर प्राणी हवा व पाण्यात राहू शकतात.
इ. पृष्ठवंशीय प्राण्यांत मेंदूचे कार्य अधिक विकसित झालेले असते.
ई. अमिबा हा बहुपेशीय प्राणी आहे.

५. **दोन नावे लिहा.**

| | |
|---|---|
| अ. सपुष्प वनस्पती | उ. वेल |
| आ. अपुष्प वनस्पती | ऊ. वार्षिक वनस्पती |
| इ. वृक्ष | ए. द्विवार्षिक वनस्पती |
| ई. झुडूप | ऐ. बहुवार्षिक वनस्पती |

६. **खालील प्रश्नांची उत्तरे द्या.**

अ. वनस्पतीचे अवयव कोणते?
आ. मुळांची कार्ये कोणती?
इ. सजीवांच्या वर्गीकरणाची आवश्यकता का आहे?
ई. सजीवांचे वर्गीकरण करताना कोणते निकष विचारात घेतले जातात?
उ. वेलींची काही वैशिष्ट्ये सांगा.
ऊ. रोपट्याची वैशिष्ट्ये सांगून उदाहरणे द्या.
ए. प्राण्यांचे आणि वनस्पतींचे वर्गीकरण कोणकोणत्या निकषांच्या आधारे कराल?
ऐ. प्राण्यांच्या शरीराचे संरक्षण कशामुळे होते?

७. **आकृत्या काढा.**

वनस्पतीची आकृती काढून त्यामधील मूळ, खोड, पाने हे भाग दाखवा.

**उपक्रम :**

- रोपवाटिकेला भेट द्या व तेथील वनस्पतींचे वर्गीकरण करा.
- प्राणिसंग्रहालयाला भेट देऊन प्राण्यांच्या विविधतेविषयी माहिती मिळवा.
- वनस्पतींच्या विविधतेवर निबंध लिहा.
- विविध वनस्पतींच्या बिया उन्हाळ्यात गोळा करा व त्या पावसाळ्यात मोकळ्या जागी (माळरान, टेकडी इत्यादी) टाका.

# 3. Diversity in Living Things and their Classification

**Read and understand.**



**Always remember...**

In the living world, a lot of diversity is seen both in animals and plants. Every plant and animal is unique. We should all make efforts to conserve this diversity in the living world.



**What we have learnt–**

- Plants are classified on the basis of their height and the shape of stems, period of life cycle and habitat.
- Animals are classified on the basis of the cell structure, vertebral column, method of reproduction and habitat.

## Exercise

**1. Match the pairs.**

| A Group | B Group |
|---|---|
| (a) Amphibian | (1) A Monkey |
| (b) Vertebrate | (2) A Snake |
| (c) With scales | (3) A Frog |

**2. Who is the odd one out ?**

(a) Fungus, mushroom, chrysanthemum, spirogyra
(b) Mango, banyan, palm, chick pea
(c) Grape, orange, lemon, hibiscus
(d) Sunflower, banyan, jowar, bajra
(e) Guava, radish, carrot, beetroot
(f) Deer, fish, man, worms

**3. What is the difference ?**

(a) Flowering plants – non-flowering plants
(b) A tree – a shrub
(c) Vertebrates – invertebrates

**4. True or false ?**

(a) The snail is an aquatic animal.
(b) Amphibians can live in air and in water.
(c) The function of the brain is well developed in vertebrate animals.
(s) The amoeba is a multicellular animal.

**5. Write two names of each.**

(a) A flowering plant
(b) A non-flowering plant
(c) A tree
(d) A shrub
(e) A creeper
(f) An annual plant
(g) A biennial plant
(h) A perennial plant

5ILTXY

**6. Write answers to the following.**

(a) What are the parts of a plant ?
(b) What are the functions of the root ?
(c) Why is it necessary to classify living things ?
(d) What are the criteria used to classify living things ?
(e) Tell some characteristics of creepers.
(f) Explain the characteristics of herbs with two examples.
(g) On the basis of which criteria will you classify plants and animals ?
(h) What protects the bodies of animals?

**7. Draw figures.**

Draw the figure of a plant to show the parts, namely, the root, stem and leaves in it.

**Activity :**

- Visit a plant nursery and classify the plants there.
- Visit a zoo and obtain information about the diversity in animals.
- Write an essay on diversity in plants.
- Collect seeds of various plants during summer and throw them in open spaces (fallow land, moorland, hill, etc.) during the rainy season.

टेस्ट सोडवा

## अध्ययन कौशल

पाठ्यपुस्तक में आए हुए कठिन शब्दों के अर्थ वर्णक्रमानुसार शब्दकोश में देखो ।

देखा तो मजाक में उन्होंने कहा, ''अब मेरी क्षमता दरबार लगाने की नहीं रही । इस मकान में जगह की भी कमी है ।'' फिर हम सबको गुरुदेव से परिचय कराया गया । बाद में वार्तालाप शुरू हुआ ।

चर्चा के दौरान गुरुदेव ने कहा, ''अब से पचास बरस पहले जब मैंने कहानियाँ लिखना शुरू किया था तो इस क्षेत्र में एक आध ही आदमी था । मेरी प्रारंभिक कहानियों में ग्रामीण जीवन के संसर्ग का ही वर्णन है । उसके पहले इस तरह की कोई चीज बांग्ला भाषा में नहीं थी । मेरी कहानियों में ग्रामीण जनता की मनोवृत्ति के दर्शन होते थे । उन कहानियों में कुछ ऐसी चीज है जो संसार के किसी भी देश के आदमी को भा सकती है क्योंकि मनुष्य स्वभाव तो दुनिया में हर जगह एक-सा ही है ।''

गुरुदेव कुछ समय के लिए रुके तभी अपने आप मेरे मुँह से निकल पड़ा, ''गुरुदेव आपके मन में 'काबुलीवाला' इस कहानी का विचार कैसे आया ? यह लोकप्रिय कहानी देश के सभी भाषाओं के सभी बच्चों को बहुत ही प्यारी लगती है ।''

गुरुदेव बोले, ''वह कहानी कल्पना की सृष्टि है । एक काबुलीवाला था, वह हमारे यहाँ आता था और हम सब उससे बहुत परिचित हो गए थे । मैंने सोचा, उसकी भी एक छोटी लड़की होगी और जिसकी वह याद किया करता होगा । ''

इसी तरह वार्तालाप होता रहा । हम सबके लिए यह एक मानसिक खाद्य था । आश्चर्य की बात यह कि पंद्रह मिनट के बजाय चालीस मिनट हो चुके थे। अब गुरुदेव उठे, चल पड़े । जाते-जाते उन्होंने कहा, '' जब मैं ऐसे किसी वार्तालाप के लिए कम समय देता हूँ तब मेरी वह बात सचमुच ठीक न मानिएगा क्योंकि मुझे स्वयं लोगों से बातचीत करने में आनंद आता है । ''

हम सबने गुरुदेव को धन्यवाद दिया और विदा ली। मैं अतिथि गृह के मेरे कमरे में वापस आया । गुरुदेव के साथ हुए वार्तालाप से मुझे एक असाधारण उल्लास की अनुभूति हो रही थी । पर जब मुझे पता चला कि जिस कमरे में मुझे ठहराया गया था, उसी कमरे में स्वयं गुरुदेव काफी समय तक रह चुके थे तब




❑ पाठ पढ़कर सुनाएँ और दोहरवाएँ । विद्यार्थियों को अपना कोई संस्मरण सुनाने के लिए कहें । उन्हें नए शब्दों से परिचित कराकर अर्थ समझाएँ और इन शब्दों का वाक्यों में प्रयोग कराएँ । उनसे गुरुदेव रवींद्रनाथ ठाकुर जी की रचनाएँ पूछें और उनपर चर्चा करें ।

## स्वयंमूल्यमापन चाचणी पहा खालील लिंकवर..

| पहिली | दुसरी | तिसरी | चौथी | पाचवी | सहावी | सातवी |
|---|---|---|---|---|---|---|
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा |

## माझा ऑनलाईन अभ्यास – प्रत्येक घटकाच्या टेस्ट सोडवा खालील लिंकवरून

| सहावी मराठी | सहावी गणित | सेमी गणित | सहावी इंग्रजी | सहावी इतिहास |
|---|---|---|---|---|
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा |

| सहावी भूगोल | सहावी विज्ञान | सेमी विज्ञान | सहावी हिंदी |
|---|---|---|---|
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा |

## दररोजच्या माझा अभ्यास pdf तुम्हाला खालील लिंकवर मिळतील.

| पहिली | दुसरी | तिसरी | चौथी | पाचवी | सहावी | सातवी |
|---|---|---|---|---|---|---|
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा |

## इतर इयत्तांच्या ऑनलाईन टेस्ट सोडवा खालील लिंकवरून...

| पहिली | दुसरी | तिसरी | चौथी | पाचवी | सहावी | सातवी |
|---|---|---|---|---|---|---|
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा |

## MiniShala शैक्षणिक ॲप्स खालील लिंकवरून डाऊनलोड करा.

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| पहिली | दुसरी | तिसरी | चौथी | पाचवी | सहावी | सातवी |
| | | आठवी | नववी | दहावी | | |

## गुरुमाऊली शैक्षणिक ॲप्स – Click Here